Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मणिपूरमध्ये शांततेचा संदेश घेऊन मोदींचा दौरा चुराचंदपूरमध्ये ७,३०० कोटींच्या प्रकल्पांची पायाभरणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ चुराचंदपूर**




मणिपूरमध्ये दोन वर्षांपूर्वी उसळलेल्या वांशिक हिंसाचारानंतर प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी राज्याच्या दौऱ्यावर आले. सर्वाधिक हिंसाचारग्रस्त चुराचंदपूर येथे त्यांनी सभा घेऊन ७,३०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकास प्रकल्पांचे भूमिपूजन केले.

सभेत बोलताना पंतप्रधान म्हणाले, मी माझे डोके टेकवून मणिपूरला वंदन करतो. या भूमीत एक रत्न आहे, जे ईशान्येच्या उज्ज्वल भविष्यासाठी चमकणार आहे. मी मणिपूरच्या जिद्दीला सलाम करतो. शांतीचा मार्ग स्वीकारा, मी तुमच्यासोबत आहे.

पंतप्रधान दुपारी १२ वाजता इम्फाळ विमानतळावर उतरले. त्यानंतर ६४ किलोमीटरचा रस्त्याने प्रवास करून ते चुराचंदपूरला पोहोचले. मूळ नियोजनानुसार ते हेलिकॉप्टरने जाणार होते, परंतु इम्फाळमधील मुसळधार पावसामुळे त्यांना रस्त्याने प्रवास करावा लागला.

यापूर्वी पंतप्रधान मोदी मिझोरमला गेले होते. तेथे त्यांनी ९,००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली.मे २०२३ मध्ये मैतेई आणि कुकी समुदायांमध्ये हिंसाचार उसळल्यानंतर मोदींचा हा पहिला मणिपूर दौरा आहे. २०१४ ते २०२२ दरम्यान त्यांनी सात वेळा राज्याला भेट दिली होती.विरोधकांकडून गेल्या दोन वर्षांत मोदींनी मणिपूरला न भेट दिल्याबाबत टीका होत होती.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मणिपूर दौऱ्यावरुन काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केलीय. मोदींचा मणिपूर दौरा चागंली गोष्ट आहे, पण खरा मुद्दा मत चोरीचा आहे, असे राहुल गांधींनी म्हटले. तर, मोदींचा मणिपूर दौरा प्रतिकात्मकता आणि अपमान असल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. तसेच, मोदींनी अगोदरच मणिपूरला जायला हवं होतं, असे प्रियंका गांधी यांनी म्हटलं.सायंकाळनंतर १४ सप्टेंबरपर्यंत मोदी आसाम दौऱ्यात भारतरत्न भूपेन हजारिका जन्मशताब्दी महोत्सवात सहभागी होतील. त्यानंतर, प. बंगालमध्ये १५ सप्टेंबरला कोलकात्यात संयुक्त कमांडर संमेलनाचे उद्घाटन करतील, तर बिहारमधील पूर्णिया येथे राष्ट्रीय मखाना महामंडळाचे उद्घाटन मोदी करतील.

## देशभरातील घरे होणार स्वस्त; ग्राहकांना थेट लाभ देण्याची क्रेडाईची मोठी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नवी दिल्ली**

सिमेंट आणि इतर बांधकाम साहित्यांवरील वस्तू व सेवा करात (जीएसटी) झालेल्या कपातीचे फायदे थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवले जातील, अशी घोषणा देशातील प्रमुख बांधकाम व विकासक संघटना 'क्रेडाई'ने केली आहे. त्यामुळे देशातील घरे स्वस्त होणार आहेत.



क्रेडाईचे अध्यक्ष बोमन इराणी यांनी ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की, कर कपातीमुळे होणाऱ्या खर्चातील बचतीचा किती भाग ग्राहकांपर्यंत पोहचवता येईल, यावर विकासक विचार करीत आहेत.

३ सप्टेंबर रोजी जीएसटी परिषदेने सिमेंट, स्टील, टाइल्स, इतर फिनिशिंग साहित्यावरील जीएसटी कराचा दर कमी केला. त्यामुळे रिअल इस्टेट क्षेत्राला फायदा होईल. २२ सप्टेंबरपासून जीएसटी लागू होईल. त्यानंतर जीएसटीमध्ये ५ आणि १८ टक्के असे दोन दर राहतील.

सिमेंटवरील जीएसटीत १० टक्के कपात झाल्यास ३५० रुपये किमतीची सिमेंट बॅग सुमारे ३० रुपयांनी स्वस्त होऊ शकते. टिअर २ आणि टिअर ३ शहरांमध्ये कपातीचा फायदा जास्त जाणवेल. मेट्रो शहरांमध्ये मात्र परिणाम मर्यादित राहण्याची शक्यता आहे.

स्टॅम्प ड्युटी मात्र अजूनही घर खरेदीदारांसाठी मोठे ठरणारे ओझे आहे. स्टॅम्प ड्युटी आमच्या नियंत्रणाबाहेर आहे. त्यात राज्य सरकारांनी गांभीर्याने लक्ष घालणे आवश्यक आहे. इतर खर्च कमी केले तरीही स्टॅम्प ड्युटीचे ओझे घर खरेदीदारांवर राहील, असे इराणी म्हणाले.

## ऑपरेशन सिंदूरवेळी हे लंडनच्या बारमध्ये बसले होते, दाखवू का?

### भारत-पाक सामन्यावरुन नितेश राणेंचा ठाकरेंवर पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई**




मत्यव्यवसाय मंत्री नितेश राणेंनी आरोग्य शिबिराच्या माध्यमातून वरळी कोळीवाड्यात हजेरी लावली, आमदार आदित्य ठाकरेंच्या मतदारसंघात राणेंचा कार्यक्रम होत असल्याने नितेश राणे काय बोलतील याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अपेक्षेप्रमाणे नितेश राणेंनी ठाकरे पिता-पुत्रांवर जोरदार हल्लाबोल केला. स्वतः मंत्री, वडील मुख्यमंत्री होते तरी कोळीवाड्याची परिस्थिती बदलवू शकला नाही, ६ हजारांनी निवडून येणं म्हणजे बालेकिल्ला नव्हे. सध्या ते राजकीय व्हेंटिलेटवर आहेत, आम्ही २०२९ मध्ये दाखवू, असे म्हणत नितेश राणेंनी आदित्य ठाकरेंवर हल्लाबोल केला. तर, भारत-पाकिस्तान सामन्यावरुन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी केलेल्या टीकेलाही त्यांनी प्रत्युत्तर दिलं.

अडीच वर्षे येथील आमदारांचे वडिल मुख्यमंत्री होते आणि ते मंत्री होते, मोटरबाईकवर इकडे यावं लागतं किती मोठा बालेकिल्ला आहे ना? असा खोचक टोला नितेश राणेंनी लगावला. तसेच, उद्धव खानला विचारायचे आहे, विजयी मिरवणुकीत पाकिस्तानचे नारे का, हिरवा गुलाल का? तेव्हा पाकचा राग आला नाही का?. मिरवणुकीत सर तन से जुदा असे नारे दिले गेले त्यांचे राजीनामे घे ना. उद्धव ठाकरेंच्या कालावधीत ५ वर्षे महाविकास आघाडीचं सरकार टिकलं असतं तर पुढचा मुख्यमंत्री मुस्लिम झाला असता, असे म्हणत भारत-पाकिस्तान यांच्यातील सामन्यावरुन राणेंनी उद्धव ठाकरेंवर पलटवार केला.

उद्धव ठाकरेंकडे महापौर देणं म्हणजे पुढचा महापौर अब्दुल किंवा शेख होणार, घरातली पूजा देखील हे होऊ देणार नाहीत. हिंदू समाजाचे कुंकू पुसले जात होते तेव्हा लंडनवरुन परत यावे असं का वाटलं नाही?. पंतप्रधान यांनी दहशतवाद्यांचे अड्डे उद्धवस्त केले आहेत, याची लायकी नाही स्वत:च्या वडिलांचे नाव घेण्याची. बाळासाहेब यांना हे कोणत्या नावाने हाक मारायचे, म्हातारा म्हणून हाक मारायचे. हा पाकिस्तानची चाटत बसतो, याच्या ढुंगणावर लाथ मारुन बाळासाहेब यांनी हाकललं असतं, अशी तीव्र शब्दात राणेंनी उद्धव ठाकरेंवर पलटवार केला.

## जिल्ह्यात स्टिकरवाल्यां गाड्यांचाचा सुळसुळाट, आमदार फक्त नऊ

### बोगस व्हीआयपी संस्कृतीला नागरिकांचा कंटाळा

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

गाड्यांवर हे स्टिकर पाहिले की, खरोखरच मी आमदार झालोय असे वाटते, असा अनुभव अनेक वाहनधारकांना येत आहे. पण वस्तुस्थिती अशी की, हे आमदार नसून, त्यांचे नातेवाईक, समर्थक आणि कार्यकर्ते गाड्यांवर आमदारांचे स्टिकर लावून तोडफोडीचा रुबाब मिरवताना दिसत आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये अशा बोगस व्हीआयपी संस्कृतीने जोर धरला आहे.




जिल्ह्यात प्रत्यक्ष आमदारांची संख्या फक्त नऊ आहे. यात आमदार सुलभा खोडके,आ.संजय खोडके,आ. केवलराम काळे ,आ. प्रवीण तायडे,आ.प्रतापदादा अडसड, आ. गजाजन लवटे आणि आ.उमेश यावलकर हे असले तरी देखील शहरभर दिसणाऱ्या आमदारांच्या स्टिकरधारी गाड्यांची संख्या दुप्पट-तिपटीने वाढली आहे. विधानसभेसाठी हिरवे व विधानपरिषदेकरिता लाल रंगाचे अधिकृत स्टिकर असले तरी ते मिळवून गाड्यांवर चिकटविण्याचा प्रकार कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

वाहनावर आमदारांचे स्टिकर लावले की गर्दीतून सुटका, सिग्नलवरून सरळ पुढे जाणे किंवा महामार्गावर वेगाने गाडी हाकणे सोपे जाते. त्यामुळे काही चालक या स्टिकरचा गैरवापर करतात. नागरिकांच्या मते, पोलिसही अशा गाड्यांकडे दुर्लक्ष करतात. तपासणीस टाळाटाळ केली जाते, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

**व्हीआयपी थाटासाठी फ्लॅशर आणि सायरनही**

काही वाहनांवर केवळ आमदारांचे स्टिकरच नव्हे, तर निळा-लाल फ्लॅशर आणि पोलिसांसारखा सायरनही बसवलेला दिसतो. गर्दीतून सुटका मिळवण्यासाठी किंवा सिग्नल तोडण्यासाठी त्याचा वापर केला जातो. हा प्रकार वाहतूक नियमांची पायमल्ली करणारा असून, खऱ्या व्हीआयपींनाही अस्वस्थ करणारा ठरत आहे.

**कठोर कारवाईची मागणी**

शहरातील कायदा मोडणाऱ्या या वाहनधारकांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, बनावट स्टिकर तातडीने काढून घ्यावेत आणि बेकायदेशीर फ्लॅशर व सायरन बसवणाऱ्यांना दंड करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, अशा बोगस व्हीआयपी संस्कृतीवर प्रशासनाने तातडीने आळा घालणे अत्यावश्यक आहे.

## पुणे हमसफर रेल्वे गाडीच्या छतावर चढलेल्या युवकाला 'शॉक' प्रकृती चिंताजनक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

नागपूर रेल्वे स्थानकावर शुक्रवारी दुपारी एक धक्कादायक घटना घडली. एका युवकाने प्लॅटफॉर्म क्रमांक सात वर उभ्या असलेल्या पुणे हमसफर एक्सप्रेस गाडीच्या छतावर चढण्याचा प्रयत्न केला असता, त्याला ओव्हरहेड वायरचा तीव्र शॉक बसला. त्यामध्ये तो गाडीतून खाली कोसळला आणि गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित लोकांनी तातडीने मदत केली आणि त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.



प्राथमिक माहितीनुसार, संबंधित युवकाची वय अंदाजे २०-२२ वर्षे असून, तो स्थानकावर भटकंती करत होता. काही साक्षीदारांनी सांगितले की, तो गाडीच्या छतावर चढून मोबाईलसाठी फोटो किंवा व्हिडीओ काढण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, गाडीच्या छतावर चढताच त्याचा स्पर्श ओव्हरहेड इलेक्ट्रिक वायरला झाला आणि त्याला तीव्र विद्युत शॉक बसला. विजेचा झटका एवढा जोरदार होता की तो तात्काळ खाली कोसळला.स्थानकावरील सुरक्षा रक्षकांनी आणि इतर प्रवाशांनी तातडीने धाव घेतली आणि रेल्वे पोलिसांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर तातडीने युवकाला इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय रुग्णालयात नेण्यात आले. सध्या त्याच्यावर आयसीयू मध्ये उपचार सुरू आहेत. अद्याप युवकाची ओळख पटलेली नाही असून, पोलिसांकडून त्याच्या ओळखीचा शोध सुरू आहे. या घटनेनंतर स्थानकावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण होते, तर अनेकांनी अशा प्रकारच्या धोकादायक कृत्यांविरुद्ध कारवाईची मागणी केली.

## मनसेच्या ज्येष्ठ नेत्याकडून पक्षाला जय महाराष्ट्र....

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई**

मनसेतून एका महत्वाच्या नेत्यानं पक्षाला जय महाराष्ट्र केला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते आणि प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी आज पक्षाला सोडचिठ्ठी दिलीय. नाराजीतून त्यांनी पक्षाला रामराम ठोकल्याची चर्चा आहे. राज आणि उद्धव ठाकरे हे दोघे एकत्र यावेत, यासाठी त्यांनी भरपूर प्रयत्न केले होते. मात्र, एकत्र आल्यानंतर त्यांनी थेट पक्षाला रामराम केला. महाजन नाराज असण्यामागचं कारण काय? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.



राजीनामा दिल्यानंतर प्रकाश महाजन म्हणाले, 'माझं आता वय वाढत चाललं आहे. काही गोष्टी मनाविरूद्ध घडत आहेत. मी आता थांबायचा निर्णय घेतला आहे. माझा कुणावरही राग किंवा नाराजी नाही. मी अत्यंत लहान प्रवक्ता आहे', असं प्रकाश महाजन म्हणाले. 'माझं खरंतर कशावरही आक्षेप नाही. मी कोणत्याही मोठ्या पदावर नव्हतो. त्यामुळे माझ्यासारखा प्रवक्ता राहिला काय अन गेला काय.. याचा पक्षाला विशेष फरत पडत नाही', असंही महाजन म्हणाले.

या वयात मनस्थिती चांगली राहायला हवी. या कारणामुळे मी या सगळ्यापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. कुणीतरी जा म्हणण्यापेक्षा स्वत: आपण गेलेसं बरं', असंही महाजन म्हणाले. 'खरंतर वाईट या गोष्टीचं वाटतंय की अमित ठाकरेंना मी दिलेला शब्द पाळू शकलेलो नाही. बाकी कशाचंही ओझं माझ्या मनावर नाही', असं महाजन म्हणाले.

## मोरारी बापू यांची राम कथा सहस्त्रनाम ऐकण्याचे सौभाग्य- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ यवतमाळ**

मोरारी बापू यांच्या वाणीतून रामकथा ऐकण्याची संधी आपणा सर्वांना प्राप्त झालेले आहे. पिढ्यानपिढ्या आपण राम कथा ऐकत आलेलो आहोत, मात्र मोरारी बापू यांच्या वाणीतून राम कथा ऐकणे, हे सहस्त्रनाम ऐकण्याचे सौभाग्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे मोरारी बापू यांच्या राम कथा प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पालकमंत्री संजय राठोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, खासदार संजय देशमुख, बळवंत वानखेडे, आमदार बाळासाहेब मांगुळकर, किशोर जोरगेवार, राजू तोडसाम, ड आशिष देशमुख, किसनराव वानखेडे, सईताई डहाके, रामकथाचे आयोजक डॉ. विजय दर्डा, राजेंद्र दर्डा आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राम कथा ही सर्वात सुंदर कथा आहे. त्यामुळे ही राम कथा ऐकणे म्हणजे जीवनाचा मार्ग प्रशस्त करणे आहे. राम कथेमध्ये संपूर्ण जीवनाची सुंदर शिकवण आहे. मोरारी बापू यांच्याकडून अर्थपूर्ण राम कथा ऐकायला मिळणे हे प्रत्येकासाठी सौभाग्याचा क्षण आहे. प्रभू रामचंद्राचे जीवन हे मर्यादेचे पालन करणारे आहे. त्यामुळे ते सर्वोत्तम मर्यादा पुरुष ठरले आहेत. राम कथा ही त्याग, तप, तेज, अनुशासन आणि भावनांचा संगम आहे. आज पाचशे वर्षानंतर प्रभू राम अयोध्येत त्यांच्या हक्काच्या ठिकाणी विराजमान झाले आहेत. ही प्रत्येक भारतीयाला गौरव वाटणारी बाब आहे.जवाहरलाल दर्डा यांच्या जीवनावर आधारित पुस्तक 'पेन अँड पर्पज' त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे आहे. यातून त्यांचे स्वातंत्र्यसंग्रामामधील योगदान, तसेच प्रगत महाराष्ट्राचे चित्र दिसून येते. या पुस्तकातून जवाहरलाल दर्डा यांच्या राज्याच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानासह त्यांच्या जीवनचरित्राचे पैलूही समोर आले आहे. जवाहरलाल दर्डा यांनी संस्कृती, उद्योग यासह सर्वच क्षेत्राला दिशा देण्याचे काम केले.



## संपादकीय ......

# नवे उपराष्ट्रपती...

महाराष्ट्राचे राज्यपाल व राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांची देशाचे १४वे उपराष्ट्रपती म्हणून झालेली निवड मुळीच अनपेक्षित नाही. एनडीएकडे विजयासाठी पुरेसे संख्याबळ होतेच, तरीही भाजपने एकेका मताचा बारकाईने विचार केला होता. या प्रयत्नात कोणतीही कसर न ठेवता आपली ताकद दाखवून देण्याची आणखी एक संधी नेमकी साधली. एनडीए आघाडीची मते फुटतील, आश्चर्याचा धक्का बसेल, अशा बढाया इंडिया आघाडीचे अनेक नेते मारत होते. प्रत्यक्षात उलटेच घडले. राजकारणात पडद्यामागच्या हालचाली, मतांची गणिते आणि त्यासाठीच्या व्यूहरचना यास महत्त्व असते.


प्रदीर्घकाळ सत्तेत राहिलेल्या काँग्रेसकडे पूर्वी ही कौशल्ये होती; पण आता भाजपने याबाबत काँग्रेसवर मात केल्याचे दिसते. म्हणूनच मतदानात राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली, तर विरोधकांच्या इंडिया आघाडीचे उमेदवार निवृत्त न्या. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मतेच मिळाली. आघाडीची किमान १२ मते फुटल्याचे सांगितले जाते. संसदेच्या दोन्ही सभागृहांमधील ७८१ पैकी ७६८ सदस्यांनी मतदान केले. त्यापैकी ७५२ वैध, तर १५ मते अवैध ठरली. भारत राष्ट्र समितीचे चार, बिजू जनता दलाचे सात, शिरोमणी अकाली दल व अपक्ष प्रत्येकी एक अशा १३ सदस्यांनी मतदान केले नाही. एनडीए आघाडीकडे लोकसभेत २९३, तर राज्यसभेत १३३ अशा ४२६ खासदारांचे पाठबळ होते.

याखेरीज वायएसआर काँग्रेसच्या लोकसभेतील ४ आणि राज्यसभेतील ७ अशा ११ सदस्यांची मतेही निश्चित होती. त्यामुळे राधाकृष्णन यांना ४३७ खासदारांची मते अपेक्षित होती. शिवाय काही छोट्या पक्षांनीही त्यांच्या बाजूने मतदान केले असावे. हा सर्व हिशेब करता त्यांना ४४० मते अपेक्षित होती. वास्तवात त्यांना १२ मते जास्त मिळाली, तर आघाडीकडे ३१५ मते होती. त्यात लोकसभेतील २३० व राज्यसभेतील ७६ मतांचा अंतर्भाव होता. शिवाय दोन्ही सदनांतील ९ अपक्षांचाही पाठिंबा अपेक्षित होता. सध्या आघाडीत नसलेल्या 'आप'ने दोन्ही सभागृहांतील मिळून १२ मते इंडिया आघाडीचे उमेदवार रेड्डी यांना देण्याचे जाहीरच केले होते. त्यामुळे आघाडीला ३२७ मते मिळणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात त्यापेक्षा त्यांना २७ मते कमी मिळाली.

खरे तर, काँग्रेस नेते खासदार जयराम रमेश यांनी आघाडीकडे ३१५ मते होती आणि प्रत्येक सदस्याने मतदान केल्याचे ट्विट केले होते, तरीही फक्त ३०० मतेच कशी पडली? कोणाची मते फुटली, याबद्दल बरीच चर्चा असून, याविषयी निश्चित कोणी काही सांगू शकत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट या पक्षांतील खासदारांना बाजूने वळवण्याचा प्रयत्न एनडीएने केला होता. त्यातच अवैध ठरलेली १५ मते एनडीए आघाडीतील असतील, तर आघाडीतील फुटीर मतांची संख्या अधिकच असल्याचे मानावे लागेल.लोकसभा निवडणूक होऊन सव्वा वर्ष लोटले, तरीही विरोधकांमध्ये एकजुटीचा अभाव असल्याचे दिसते. दीड महिन्यापूर्वी उपराष्ट्रपती धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर केंद्र सरकार अस्थिर आहे, नेतृत्वात बदल होणार, अशी चर्चा होती. आता धनखड यांच्या रूपाने जम्मू-काश्मीरचे दिवंगत राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्याप्रमाणेच केंद्र सरकारविरुद्ध बोलणारा एक नवा 'बंडखोर' हाताशी लागला आहे, असे मांडे विरोधी नेते मनातल्या मनात खाऊ लागले होते. प्रत्यक्षात धनखड यांच्या जागी राधाकृष्णन यांची निवड होणे ही प्रक्रिया सुरळीत पार पडली.

डॉ. शंकरदयाळ शर्मा यांच्यानंतर उपराष्ट्रपतिपदी निवड झालेले राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे दुसरे राज्यपाल ठरले आहेत. यापूर्वी देशातील दुसर्या क्रमांकाचे घटनात्मक पद भूषवणारे शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे तामिळनाडूचेच होते. तसेच व्ही. व्ही. गिरी हेही पुढे राष्ट्रपतीही बनले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी जातनिहाय जनगणनेचा मुद्दा लावून धरत असतानाच उपराष्ट्रपतिपदासाठी एका ओबीसी नेत्याची निवड, हे भाजपने विचारपूर्वक उचललेलेच पाऊल आहे.शोषित-वंचित घटकांना जेव्हा उच्च घटनात्मक पदे भूषण्याची संधी मिळते, तेव्हा त्यापासून त्या त्या घटकातील लोकांना चांगली प्रेरणा मिळत असते. राधाकृष्णन यांनी प्रचारात राष्ट्रीयत्वाची भावना जागवली. काही वर्षांपूर्वी त्यांनी भारतीय नद्यांची जोडणी करण्याच्या मागणीसाठी ९३ दिवसांची रथयात्रा काढली होती. त्यामागे नदीजोडणीतून राष्ट्रीय विकासाचाच त्यांचा आग्रह दिसला. धनखड प्रकरणामुळे एनडीए आघाडीत नाराजी असून, भाजपच्या खासदारांतील कथित असंतोषाचे पडसाद उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत उमटतील, अशी चर्चा होती; पण ती केवळ अफवाच ठरली. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग झाल्याचे प्रकार यापूर्वीही घडले आहेत. १९९७ मध्ये इंदरकुमार गुजराल यांचे सरकार दुबळे होते. त्यावेळी जनता दलाचे कृष्णकांत या पदावर निवडून आले. तेव्हा त्यांना ४४१, तर अकाली दलाच्या सुरजित सिंग बर्नाला यांना २७३ मते पडली. त्यावेळी ३० खासदार गैरहजर राहिले, तर ४७ मते अवैध ठरली होती.यावेळी भाजपमधून क्रॉस व्होटिंग झाले असते, तर पक्ष नेतृत्वाची पक्ष व सरकारवरील पकड सैल झाली आहे, असे संकेत गेले असते; पण तसे न घडता उलट विरोधी आघाडीची मते फोडून पंतप्रधानांनी पक्ष व सरकारवरील प्रभुत्व अजूनही अबाधित असल्याचे सिद्ध केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणामुळे एक नवे आर्थिक आव्हान समोर उभे आहे. बांगला देशप्रमाणे नेपाळमध्येही हिंसाचार व अस्थिरता निर्माण झाली आहे. शेजारी देशांतील अराजकता हा चिंतेचा विषय आहे. अशावेळी भारतात राजकीय स्थैर्य आवश्यक आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत निर्विवाद यश मिळवून ते भक्कम स्थैर्य असल्याचा संदेश देताना पंतप्रधान मोदी यांनी देश सुरक्षित असून समर्थ नेतृत्वाच्या हातात आहे, हे पुन्हा सिद्ध केले आहे.



## मोबाईलच्या व्यसनामुळे लक्ष विचलित होतंय? तर मग 'या' योगाने मिळवा उपाय

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक आरोग्य सांभाळणे हे मोठं आव्हान बनलं आहे. सोशल मीडिया, मोबाईलचा अति वापर आणि सततच्या स्क्रीन टाइममुळे मुलं आणि तरुणांमध्ये एकाग्रता कमी होणं, झोपेच्या समस्या, स्मरणशक्ती कमी होणं यासारख्या तक्रारी वाढल्या आहेत. यावर सहज उपाय आहे.

**अनुलोम-विलोम प्राणायाम.**

योग प्रशिक्षक रामदेवबाबा सांगतात की, रोज फक्त ५ ते १० मिनिट हा प्राणायाम केल्याने शरीर आणि मन दोन्ही निरोगी राहतात. मानसिक तणाव कमी होतो, मेंदूची कार्यक्षमता वाढते आणि स्मरणशक्ती सुधारते.

**पावसाळ्यात अनुलोम-विलोमचे विशेष महत्त्व**

पावसाळ्यात वातावरणातील बदलामुळे सर्दी-खोकला, व्हायरल फिव्हर, श्वसनाचे आजार पटकन होतात. प्राणायाम केल्याने श्वसन संस्थेची ताकद वाढते, फुफ्फुसांची क्षमता सुधारते आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. त्यामुळे पावसाळ्यात अनुलोम-विलोम अधिक फायदेशीर ठरतो.

**मोबाईल आणि सोशल मीडियामुळे एकाग्रतेवर परिणाम**

आजकालच्या मुलांमध्ये मोबाईल, गेम्स आणि सोशल मीडियामुळे अभ्यासात लक्ष लागत नाही. शिक्षकांनी शिकवलेलं पटकन विसरतात, परीक्षेत गुण कमी येतात. योग प्रशिक्षक सांगतात की, अनुलोम-विलोम केल्याने मेंदूत ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो, न्यूरॉन्सची कार्यक्षमता सुधारते आणि एकाग्रता वाढते.

**अनुलोम-विलोम करण्याची स्टेप-बाय-स्टेप पद्धत**

शांत जागी पद्मासन किंवा वज्रासनात बसा.

उजव्या हाताचा अंगठा वापरून उजवी नाकपुडी बंद करा.

डावीकडून हळूहळू, खोल श्वास घ्या.

अनामिकेने डावी नाकपुडी बंद करून उजवीकडून श्वास सोडा.

पुन्हा उजवीकडून श्वास घेऊन डावीकडून सोडा.

हा एक चक्र झाला. असे ५-१० मिनिटे दररोज करा.

७-१० दिवसांत मन शांत होतं आणि १५-२० दिवसांत स्मरणशक्तीत सुधारणा दिसून येते.


# मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील 'नवीन नागपूर'

महाराष्ट्र राज्याने विविध क्षेत्रात विकासाची घोडदौड सुरु ठेवली आहे. राज्यातील शहरी व ग्रामीण भागाच्या विकासाचा समतोल साधन्यासही यात प्राधान्य आहे. महाराष्ट्राचा औद्योगिक त्रिकोण, पुणे येथे आयटी क्षेत्राची भरभराट तसेच कोकण,नाशिक,कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर,नागपूर येथील औद्योगिक विकासातून त्या-त्या भागातील उद्योगाला चालना देण्याचे कार्यही जोमाने सुरु आहे. नवे आव्हान व नव्या संधी यांची सांगड घालत नव्या युगाच्या अपेक्षांना पूर्ण करुन विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने महाराष्ट्रानेही आपली जबाबदारी स्विकारली आहे. याचदिशेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात अग्रेसर होत नागपूरसह विदर्भाला प्रगती पथावर घेऊन जाण्यासाठी 'नवीन नागपूर' या महत्वाकांक्षी आंतरराष्ट्रीय व्यवसाय व वित्तीय केंद्र उभारणीच्या दिशेने नुकतेच महत्वाचे निर्णय व सामंजस्य करार झाले आहेत. या प्रकल्पाचे नामाभिदान दस्तूरखुद्द मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले आणि त्यांच्याच अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीत प्रकल्पास मंजुरी मिळाली आणि त्यांच्याच उपस्थितीत ६ हजार ५०० कोटींचा सामंजस्य करारही झाला. विदर्भासह महाराष्ट्राला विकासाच्या मार्गावर पुढे घेऊन जाण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे.देशातील एक अत्याधुनिक आणि जागतिक पातळीवरील वित्तीय व व्यवसाय केंद्र बनण्याच्या दिशेने पडलेले हे एक निर्णायक पाऊल आहे.नागपूरच्या आर्थिक नकाशावर हा प्रकल्प गेम चेंजर ठरणार आहे.

भौगोलिकदृष्टया भारताचे हृदय अर्थात झिरो माईल्सचे शहर व मध्यभारतातील सर्वात मोठे, महाराष्ट्राची उपराजधानी, टायगर कॅपिटल, विदर्भाचे मुख्यालय आणि राज्यातील लोकसंख्येच्यादृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे शहर आदी बिरुदावल्यांसह गौरवशाली सामाजिक,आर्थिक,ऐतिहासिक, राजकीय व संस्कृतिक वारसा असणारे नागपूर शहर. आता समृद्धी महामार्गाचा झिरो माईल,मेट्रो ट्रेन,ग्रीन बसेस,उड्डानपुल,एलिवेटेड मार्ग,विमानतळ आणि रेल्वेसह सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा, महत्वाची प्रशासकीय कार्यालये,शैक्षणिक संस्थांनी हे शहर समृद्ध झाले आहे.देशातील पहिले प्रायोगिक तत्वावरील स्मार्ट व इंटेलिजंट गाव उभारण्याचा मानही नागपुरला नुकताच मिळाला आहे. याच कडीत शहराच्या विकासाला गती देत जागतिक दर्जाच्या सुविधांनी युक्त असे महत्वाचे व्यवसाय व वित्तीय केंद्र बनन्याच्या दिशेने 'नवीन नागपूर'च्या रुपाने महत्वाचे पाऊल टाकले गेले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या द्रष्टया नेतृत्वात व मार्गदर्शनात नागपूरला कॉर्पोरेट ऑफिसेसचे राष्ट्रीय केंद्र बनविण्यासह व्यवसाय, निवासी आणि सामाजिकबाबींचा अंतर्भाव असलेल्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच शहराला मध्य भारतातील तंत्रज्ञान व नवोपक्रम केंद्र म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने 'नवीन नागपूर' या महत्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी होत आहे. महाराष्ट्रातील भावी आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि वित्तीय केंद्र (आयबीएफसी ) म्हणून नवीन नागपूर या भव्य प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ८ सप्टेंबर २०२५ रोजी नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि केंद्र शासनाच्या नवरत्न दर्जाच्या राष्ट्रीय इमारत बांधकाम महामंडळ लिमिटेड (एनबीसीसी-इंडिया लि.) आणि गृह आणि नगर विकास महामंडळ लिमिटेड (हुडको ) यांच्यात दोन महत्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. एनएमआरडीए आणि एनबीसीसी (इंडिया) लि. यांच्यात झालेल्या करारानुसार एकूण १ हजार ७१० एकरावरील ग्रीन फिल्ड कृषी जमीनीवर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. प्रती पाच वर्षानुसार एकूण तीन टप्प्यात या प्रकल्पाच्या विकासासाठी १००० एकर जमीनीचा उपयोग करण्यात येणार असून उर्वरित ७१० एकर जमीन भविष्यातील विस्तारासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. हा विकास प्लग-अँड-प्ले मॉडेलवर आधारित असेल. यात समाविष्ट होणाऱ्या सुविधांमध्ये समाकलित भूमिगत उपयुक्तता टनेल्स, डिस्ट्रिक्ट कूलिंग सिस्टम, स्वयंचलित कचरा संकलन व वर्गीकरण प्रकल्प, स्टार्ट-अप्स, एमएसएमई , आयटी कंपन्या, व्यावसायिक केंद्रे, तसेच निवासी व मिश्र वापर प्रकल्प यांचा समावेश आहे. यासाठी एनएमआरडीएच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक सक्षम समिती स्थापन करण्यात येणार आहे.

दुसरा महत्वाचा करार एनएमआरडीए आणि हुडको यांच्यात करण्यात आला. या करारांतर्गत हुडको ६,५०० कोटी रुपये नवीन नागपूर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी देण्यात आले आहे. या निधीमुळे हा प्रकल्प वेगाने आकार घेणार आहे व या भागीदारीत कार्यशाळा, प्रशिक्षण व क्षमतावृद्धी कार्यक्रमांचाही समावेश आहे.नागपूर महानगर प्रदेशांतर्गत हिंगणा तहसिलच्या लाडगाव-रिठी आणि गोधणी-रिठी परिसरात समृद्धी महामार्गालगतच्या एकूण १ हजार ७१० एकरावरील ग्रीन फिल्ड कृषी जमीनीवर बाह्य रिंगरोड पासून २ कि.मी.अंतरावर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. प्रती पाच वर्षानुसार एकूण तीन टप्प्यात या प्रकल्पाच्या विकासासाठी १००० एकर जमीनीचा उपयोग करण्यात येणार असून उर्वरित ७१० एकर जमीन भविष्यातील विस्तारासाठी वापरण्यात येणार आहे. दळणवळणाच्यादृष्टीने हा प्रकल्प समृद्धी महामार्गाला लागून आंतरराष्ट्रीय विमानतळापासून १५ मिनिटांच्या तर रेल्वे स्थानकापासून ३० मिनिटांच्या अंतरावर तर लवकरच विस्तारीत मेट्रो मार्गाच्या लगत असणार आहे.



### कॉर्पोरेट क्षेत्राला मिळणार विदर्भातील कुशल मनुष्यबळ

राज्याचे ज्ञान कॉरीडॉर म्हणून हा प्रकल्प नावारुपाला येणार आहे. भौगोलिकदृष्टया लगत असल्याने नागपुरच्या परिसरातील ४१ अभियांत्रिकी महाविद्यालये,२८ खाजगी शैक्षणिक संस्था, सर्वात जास्त अभियात्रिकी महाविद्यालये असणारा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा विभाग व येथील विद्यार्थ्यांना नोकरीची नामी संधी असणार आहे. महत्वाचे म्हणजे विदर्भातून वर्षाकाठी अभियांत्रिकी पदवी घेवून उत्तीर्ण होणाऱ्या जवळपास १६ हजार विद्यार्थ्यांनाही यातून संधीची दारे उघडी होणार आहेत.भरीस भर म्हणून या प्रकल्पासाठी नागपुरातील आयआयएम, एम्स, ट्रीपल आय आयटी, व्हिएनआयटी, व्यवस्थापन व तंत्रज्ञान संस्था (आयएमटी), महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ (एन.एल.यु.) यांच्यासह निम्स व सिम्बॉयसिस या भारतीय व जागतिक शैक्षणिक संस्थांसोबत करार करण्यात येणार आहे.

### एकाच ठिकाणी डिजीटल समाधान व एकल खिडकी मंजुरी

या प्रकल्पात समाविष्ट होण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्र आणि सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग तसेच स्टार्टअप्सचे एकाच ठिकाणी डिजीटल समाधान होणार असून एकल खिडकी मंजुरी मिळणार आहे. या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध मान्यता, आंतरराष्ट्रीय व्यापार व आर्थिक केंद्र (आयबीएफसी) मंजुरी तसेच आरबीआय, सेबी आणि इरडईकडून नाहरकत प्रमाणपत्र,जीएसटी नोंदणी, अर्जाची रियल टाईम स्थिती, शुल्काचा ऑनलाईन भरणा आणि पॅन,डिन व सीन यांचे रियल टाईम पडताळणी एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. विविध मान्यता सुलभ होण्यासाठी नगर रचना, वीज व सार्वजनिक सुविधा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ(आवश्यक पर्यावरणीय मंजुरी), कामगार व कर विभाग, ऊर्जा विभाग आणि नोंदणी,मुद्रांक व महसूल विभागाच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

### प्रकल्पातील महत्वाचे टप्पे ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले 'नवीन नागपूर' नाव

या प्रकल्पाच्या उभारणीसाठी नोव्हेंबर २०२४ मध्ये गुजरात राज्यातील गांधीनगर जिल्ह्यातील गिफ्ट इंटरनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस सेंटर (गिफ्ट सिटी), बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई आणि पंजाब राज्यातील मोहाली येथील आयटी सिटी तथा स्टार्टअप हब ला भेटी देवून पाहणी करण्यात आली. डिसेंबर २०२४ मध्ये नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्या समक्ष प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रकल्पास प्राथमिक मान्यता दिली. या महत्वाकांक्षी प्रकल्पाला 'नवीन नागपूर' हे समर्पक नाव दस्तूरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दिले. या सर्व प्रकल्प उभारणीसाठी आर्थिक पाठबळ मिळण्याबाबत एप्रिल-मे २०२५ मध्ये केंद्र शासनाच्या नवरत्न दर्जाच्या राष्ट्रीय इमारत बांधकाम महामंडळ लिमिटेड (एनबीसीसी-इंडिया लि.) आणि गृह आणि नगर विकास महामंडळ लिमिटेड (हुडको लि.) यांच्या सोबत प्राथमिक स्तरावरील बैठका पार पडल्या.

जून महिण्यात या प्रकल्पास गती देण्याच्या दृष्टीने महत्वाच्या घडामोडी घडल्या त्यानुसार नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (एनएमआरडीए) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना कायद्याच्या कलम ३७ अंतर्गत नवीन नागपुरसाठी भूमी आरक्षित करण्यास मंजुरी दिली. २४ जून २०२५ रोजी राजपत्र प्रकाशित करण्यात आले व स्थानिक वृत्तपत्रामध्येही ते प्रसिद्ध झाले. याअंतर्गत याबाबत ७/१२ उताऱ्यावरुन एकूण ७३८ व्यक्तीगत सूचना देण्यात आल्या. याच महिण्यात प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार संस्था म्हणून एनबीसीसीची ४ टक्के शुल्काने नेमणूक करण्यात आली व हुडकोला ८.६० टक्के त्रैमासिक व्याजदराने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मान्यता देण्यात आली. जुलै २०२५ मध्ये विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था नागपूर (व्हीएनआयटी) च्या मदतीने सामाजिक व पर्यावरणीय परिणाम मुल्यांकन अभ्यास करण्यात आला. याच महिण्यात हुडकोने या प्रकल्पासाठी भूमीअधिग्रहणाकरिता ८.६० टक्के व्याजदराने ३ हजार कोटींच्या निधीस मंजुरी दिली. या सर्वांचा परिपाक म्हणून ३ सप्टेंबर २०२५ रोजी राज्याच्या मंत्रिमंडळात या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली. येथून ५ दिवसांनी म्हणजे ८ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नवीन नागपूरच्या विकासासाठी एनएमआरडीए, एनबीसीसी आणि हुडको यांच्या दरम्यान दोन महत्वपूर्ण सामंजस्य करार झाले.

### अंदाजित ५ लाख कामकरी व १ लाख रोजगार

नवीन नागपूर' हा प्रकल्प एकूण ६९२ हेक्टर (१ हजार ७१० एकर) परिसरात उभारला जाणार असून येथे १ लाख निवासी तर ५ लाख कामकरी असण्याचा तसेच जवळपास १५ अब्ज अमेरिकन डॉलर अर्थ निर्मितीचा अंदाज आहे. एकूण उपलब्ध क्षेत्रापैकी ४५ टक्के क्षेत्र व्यावसायीक कार्यासाठी, २० टक्के क्षेत्र दळणवळणासाठी तर निवास, सेवा-सुविधा आणि हरित व मोकळया क्षेत्रासाठी प्रत्येकी १० टक्के भूभागाचा उपयोग होणार आहे तसेच ५ टक्के क्षेत्रावर सामाजिक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत.

प्रकल्पाद्वारे सुरुवातीच्या पाच वर्षांपर्यंत सरासरी प्रतिवर्षी २५ हजार ७२१ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. सरासरी ३० हजार मासिक वेतनानुसार १८ हजार ५१९ कोटी रुपये वेतनावर खर्ची पडणार आहे. एकूण प्रकल्पापैकी ४५ टक्के म्हणजेच ४५० एकर भूमीही व्यावसायिक परिसर म्हणून वापरण्यात येणार असून येथे २० हजार ९१६ कार्यालये उभारण्यात येणार आहेत. रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये जवळपास ७४ हजार कोटींची गुंतवणूक होऊ शकेल. कॉर्पोरेट क्षेत्र आणि सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग तसेच स्टार्टअप्स यांची योग्य सांगड घालण्यात येणार आहे. याअंतर्गत कॉर्पोरेट क्षेत्रासाठी ५० टक्के तर सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी ३० टक्के विभागणी होवून मॉडयुलर युनिटसह बिझनेस पार्क उभारण्यात येईल आणि १०० टक्के प्लग-अँड-प्ले कोवर्कींग स्पेस नुसार २० टक्के क्षेत्र स्टार्टअप्ससाठी देण्यात येणार आहे.

### अशी होणार आर्थिक उलाढाल

जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र उभारतांना योग्य आर्थिक घडी बसविण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. यानुसार पहिल्या पाच वर्षांपर्यंत ९८ हजार ८६० कोटींचा महसूल निर्माण होणार आहे. मुख्यत्वे व्यावसायीक युनिट विक्रीच्या माध्यमातून ८४,६८०.६४ कोटी रुपये उभारण्यात येणार आहेत. निवासी युनिट विक्रिद्वारे ११,२९१ कोटी तर सोयी सुविधासाठी २,०९१ कोटी आणि विकास कार्य मंजुरींच्या मोबदल्यात ७९८ कोटींचा महसूल निर्माण होणार आहे. तुलनेत एकूण खर्च ११,३५६ कोटी होणार असून यातील ५७ टक्के खर्च पायाभूत सुविधांवर, २६ टक्के खर्च जमीन अधिग्रहणासाठी, रस्ते निर्माणासाठी ५ टक्के, पर्यावरणीय मंजुरीसाठी १ टक्के आणि सोयीसुविधांसाठी २ टक्के खर्च येणार आहे. यासोबतच सल्लागार सेवेसाठी ४ टक्के आणि विपणन आणि आकस्मिक खर्चापोटी ५ टक्के खर्च होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत नागपूरसह विदर्भामध्ये उद्योग आणण्यासाठी विविध कंपन्यांसोबत केलेले सामंजस्य करार, गडचिरोली जिल्ह्याला विकासाच्या मार्गावर अग्रणी करण्याकरिता घेतलेले निर्णय व त्याची होत असलेली अंमलबजावणी, विदर्भात विमानतळ उभारण्यासाठी घेतलेला सक्रीय पुढाकार आणि नगळगंगा -वैनगंगा नदी जोड प्रकल्पाद्वारे विदर्भातील दुष्काळी भागात सिंचनाद्वारे शेतीच्या विकासासाठी घेतलेला पुढाकार आता या विकास प्रवासाला 'नवीन नागपूर' प्रकल्पाच्या माध्यमातून अधिक बळ मिळून विकासाची गतीही वाढणार आहे.

**रितेश मो.भुयार,**
माहिती अधिकारी,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,नागपूर.

# भाजीपाला पिकांमध्ये डाऊनी मिल्ड्यूचा प्रादुर्भाव, असे करा नियंत्रण

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप टोमॅटो. वांगी, मिरची, भेंडी, गवार, व वेलवर्गीय भाजीपाला तसेच कोबी व फ्लॉवर पिकामध्ये खांदणी करून झाडांना भर लावावी.

**सद्यस्थितीतील व्यवस्थापन**

जोरदार पावसामुळे भाजीपाला पिकांच्या बुंध्याजवळची माती वाहून गेली असल्यास, रोपांना मातीची भर द्यावी.

वेगवान वाऱ्यांपासून संभाव्य नुकसान टाळण्यासाठी वेलींना आधार द्यावा.

ढगाळ वातावरण व वाढलेल्या आर्द्रतेमुळे वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये केवडा (डाऊनी मिल्ड्यू) रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो.

रोगाची लक्षणे दिसताच रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत.

नियंत्रणासाठी, मेटॅलॅक्झिल एम + मॅन्कोझेब (संयुक्त बुरशीनाशक) २.५ ग्रॅम किंवा अमिटोक्ट्रॅडीन (२७%) + डायमिथोमॉर्फ (२०.२७% एससी) २ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

पुढील फवारणी आवश्यकतेनुसार १० दिवसांच्या अंतराने घ्यावी.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये पाने खाणारी अळी, तांबडे भुंगे, तुडतुडे, मावा इत्यादी किडींचा प्रादुर्भाव होऊ शकतो.

त्यांच्या नियंत्रणासाठी मॅलेथिऑन २ मिली किंवा डायमिथोएट १.५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

गरजेनुसार पुढील फवारणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने घ्यावी.

**ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# प्राचार्य राम शेवाळकर आधारवड पुरस्कार हा मोठा सन्मान : सत्कारमूर्ती वसंत आबाजी डहाके

## राम शेवाळकर आधारवड पुरस्कार वसंत आबाजी डहाके आणि समीर सराफ यांना प्रदान

## प्राचार्य राम शेवाळकर प्रतिष्ठान, नागपूरचा पुढाकार; सोमेश्वर पुसतकर सभागृह गजबजले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

सामाजिक कार्य मोठे महनिय असते. तसेच साहित्य निर्मितीचे कार्य, साहित्यिकाचे समाजासाठी योगदान मोठे आहे. या मालिकेत सुप्रसिद्ध वक्ते, लेखक प्राचार्य राम शेवाळकर यांचे नाव अजरामर आहे. अनेक साहित्यिक, विचारवंत यांची देशात, परदेशात उपेक्षा झाली पण तो आपले कार्य करीत राहतो. परिस्थितीवर मात करीत लिहिणारे संत, पंत आणि साहित्यिकांचे साहित्य आपण वाचतो. ते आनंददायी आहे. समाजाचे भलं करण्याचे त्यांचे व्रत असते. म्हणून शेवाळकर पुरस्कार स्वीकारताना साहित्य, कलेविषयी जे प्रेम व्यक्त होतं, यासाठी हा पुरस्कार स्वीकार संतोष होतो.



विदर्भसाहित्य संघासह विविध संघांशी जुळलेले, वक्ता दशसहस्त्रेषु, रसाळ वाणीचे प्राचार्य राम शेवाळकर यांच्या नावाचा हा आधारवड पुरस्कार जनष्ठान प्रतिष्ठानच्या कुसुमाग्रज पुरस्काराच्या तोडीचा आहे. तो मी आनंदाने स्वीकारतो, असे प्रतिपादन सत्कारमूर्ती वसंत आबाजी डहाके यांनी केले.

प्राचार्य राम शेवाळकर प्रतिष्ठान, नागपूरच्या वतीने प्राचार्य राम शेवाळकर आधारवड सन्मानाने २०२३ चा पुरस्कार आदित्य अनघा बँकेचे संस्थापक संचालक मा. श्री. समीर सराफ आणि २०२४ चा पुरस्कार सुप्रसिद्ध साहित्यिक, साहित्य अकादमी, जीवनव्रती पुरस्कारासह १७पुरस्कार प्राप्त, अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे मा. श्री. वसंत आबाजी डहाके व प्रभाताई गणोरकर यांना टाळयांच्या कडकडाटात प्रदान करण्यात आला. ९० व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व समिक्षक डॉ. अक्षय कुमार काळे यांच्या हस्ते, मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. अविनाश आवलगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कार्यक्रमाप्यक्ष आ. संजय भाऊ खोडके यांच्या उपस्थितीत सोमेश्वर पुसदकर भरगच्च सभागृहात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. १. लाख रुपये, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे, दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला.

**प्रतिष्ठेचा शेवाळकर पुरस्कार हा सन्मान: समीर सराफ**

जीवनातील हा पहिला पुरस्कार आणि तो प्राचार्य राम शेवाळकर यांच्या नावाचा असावा, ह्यापेक्षा आनंद आणि अभिमानाचा क्षण कोणता असणार हा पुरस्कार आदित्य अनघा बैंक सहकार्याचा आहे. सगळ्यांचा आधारवड बँकेने व्हावं, ही आशा अपेक्षा समीर सराफ यांनी व्यक्त केली. पुरस्काराची १ लाख रुपयांची रकम सराफ यांनी शेवाळकर प्रतिष्ठानला कृतज्ञतेने प्रदान केली.यावेळी अतिथीचे स्वागत निलेशखड़िकर, दिनेश बूब, रेवण सोमेश्वर पुसदकर, सलीम शेख यांनी केले. व्यासपीठावर गिरीश गांधी, आ. संजय खोडके, कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. अक्षय कुमार काळे, सुप्रसिद्ध बिल्डर आशुतोष राम शेवाळकर यांनी केले.

# मोझरी बसस्थानक परिसरात जीवघेणे खड्डे बसचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ गुरुकुंज मोझरी**

अमरावती जिल्ह्यातील मोझरी बसस्थानक परिसरात मोठ्या आणि जीवघेण्या खड्ड्यांमुळे बसचालकांना बस डेपोत टाकताना व बाहेर काढताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे वाहनांचे नियंत्रण सुटण्याच्या घटना वाढत असून अपघातांची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे.स्थानिक बसचालक व कर्मचाऱ्यांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. खड्डे इतके खोल असून त्यामध्ये बसचे टायर अडकण्याची शक्यता वाढली आहे. परिणामी, बस सेवा वेळेवर धावण्यात अडथळा येतो आहे.प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही समस्या अधिकच गंभीर बनली असून, बसचालकांनी खड्डे तात्काळ बुजवण्याची मागणी केली आहे. या भागातील प्रवाशांचाही जीव धोक्यात येत असून, लवकरात लवकर उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# शिराळा उपकेंद्राअंतर्ग नविन ११ केव्ही गावठान वाहिनी कार्यान्वित

## फिडरचे खांब/ वाहिनीला स्पर्श करू नये ; महावितरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

शिराळा वितरण केंद्रातून वीज पुरवठा करण्यात येणाऱ्या वीज ग्राहकांना २४ तास अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्याकरीता शिराळा उपकेंद्रातून नविन गावठाण फिडर वेगळे करण्यात आले आहे, सोमवार दिनांक १५ सप्टेंबरला सकाळी १० वाजता हे फिडर सुरू होत असल्याने या फिडरच्या खांबाला तसेच वाहिनीला स्पर्श करू नये असे आवाहन कार्यकारी अभियंता प्रफुल लांडे यांनी केले आहे.

महावितरणच्या ३३ केव्ही शिराळा केंद्राअंतर्गत कृषी फिडरमधून गावठाण फिडर वेगळे करून आरडीएसएस योजनेअंतर्गत नविन ११ केव्ही गावठान फिडर उभारण्यात आले आहे,पुढे हे फिडर ११ केव्ही पुसदा टाऊन फिडरला जोडण्यात आले असून या फिडरव्दारे पुसदा, टेम्भा,खानापूर, थुगांव, नांदुरा बु.,पिंपरी,सालोरा बु. आणि गोपाळपुर या गावाला वीज पुरवठा करण्यात येतो,

त्यामुळे या ११ केव्ही नविन गावठाण वाहिनीखाली नविन घर,आस्थापनाचे बांधकाम करू नये, वीज खांबाला गुरे बांधू नये,तसेच वाहिनीखालून लोखंडी सळीची वाहतूक करू नये असे आवाहन महावितरणने केले आहे.

# जिल्ह्यात रेशनची १६ दुकाने रद्द, एक निलंबित

## तपासणीत ५२ दुकानदार दोषी : धान्यांमध्ये तफावत आढळल्याने पुरवठा विभागाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**



अमरावती जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने केलेल्या तपासणीत रेशनमध्ये तफावत आढळून आल्याने ५२ रेशन दुकानदार दोषी आढळून आले आहे. यातील १६ दुकाने रद्द करण्यात आली असून एक दुकान निलंबित करण्यात आले आहे. या दुकानदारांना २० लाख १४ हजार १६५ रुपयाचा दंड ठोठाविला आहे.

जिल्ह्यात पुरवठा विभागाकडून रेशनकार्डधारकांना सुविधा मिळण्याकरिता त्यांना धान्य मिळण्यास त्रास होवू नये याकरिता विविध पथकांकडून एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२५ या दरम्यान तपासणी मोहिन राबविली होती. यामध्ये १९१६ रेशन दुकानांपैकी १५६१ दुकानांची तपासणी करण्यात आली. याशिवाय ९२ दुकानांमध्ये आकस्मिक भेट देण्यात आली. तर प्राप्त तक्रारीवरुन १३ दुकानांची चौकशी जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांचे आदेशावरुन करण्यात आली. या तपासणीमध्ये ३५ दुकानदार किरकोळ दोषी, एक दुकानदार मध्यम व १६ दुकानदार हे गंभीर दोषी आढळून आले. असे एकुन ५२ रेशन दुकानदार दोषी आढळून आले आहे. त्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी गंभीर दोषी आढळलेल्या १६ दुकाने रद्द केली असून मध्यम दोषी आढळलेले एक दुकान निलंबीत केले आहे. या सर्व दुकानदारांवर२० लाख १४ हजार १६५ रुपयांचा दंड ठोठावला आहे. या कारवाईमुळे धान्यांचा काळा बाजार करणाऱ्या रेशन दुकानदारांचे धाबे मात्र चांगलेच दणाणले आहे.

> रेशनधारकांना त्रास होऊ नये, याकरिता रेग्युलर तसेच तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी सुरू असते. या तपासणीतून दोषी आढळलेल्या दुकानदारांवर कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय आमची तपासणी मोहिम सुरूच आहे.
>
> **निनाद लांडे, जिल्हा पुरवठा अधिकारी.**

# चांदूरबाजार तालुक्यातील सीताफळाला जिल्ह्याबाहेर मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ चांदुर बाजार**

चादूरबाजार तालुक्यातील देऊरवाडा, काजळी, ब्राम्हणवाडा थडी, कोदोरी, निंभोरा या गावांमध्ये यंदा सीताफळांचे समाधानकारक उत्पादन झाले असून या फळांना जिल्ह्याबाहेरही मोठी मागणी होत आहे. गावरान चव, आरोग्यदायी गुणधर्म आणि कमी खर्चात जास्त उत्पादन या विशेषतामुळे विदर्भातील अनेक गावामध्ये सीताफळाच्या उत्पादनास मोठी चाल मिळत आहे. परिणामी विक्रीवाढली असून एका कॅरेटसाठी ६०० ते ७०० रुपये इतका दर मिळत आहे. सामान्यत: विजयादशमीच्या सुमारास सीताफळांची बाजारात आवक सुरू होते, मात्र यंदा गणेशोत्सवाच्या आधीपासूनच बाजारपेठेत सीताफळांची विक्री सुरू झाली आहे. चादूरबाजारमधील जयस्तंभ चौक आणि इतर ठिकाणी अनेक विक्रेते सीताफळांची विक्री करताना दिसत आहेत. विक्रेत्यांच्या मते यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे फळाचा दर्जा उत्तम असून त्यामुळे ग्राहकांची मागणीही वाढली आहे.




एका कॅरेटमध्ये फळानुसार मोठ्याफळाची सख्या सुमारे ५० ते ५५ फळे येतात, तर साधारण फळे एका कॅरेटमध्ये ६० ते ६५ अशाफळांना ६०० ते ७०० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले असून त्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. आरोग्याच्या दृष्टीनेही सीताफळ अत्यंत गुणकारी फळ मानल्या जात आहे. सीताफळाचे उत्पादन व विक्री यामध्ये सध्या प्रचंड उत्साह दिसून येत असून आगामी काळातही याचे दर स्थिर राहतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# शुक्रवारला शहरामध्ये ११ मिमी पावसाची नोंद; खरीपाची पिके धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

मागील काही दिवसापासून पाऊस सतत सुरू आहे. दरम्यान शुक्रवारी १२ सप्टेंबरला दिवसभरात शहरात ११ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सततच्या या पावसामुळे जिल्ह्यातील काही तालुक्यातील खरीपाची पिके घोक्यात आली आहे. शुक्रवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. दुपारच्या सुमारास शहरातील बृहतांश भागात मध्यम स्कपाचा पाऊस सुरू झाला. त्यानंतर रात्रीपर्यंत अधूनमधून शहरात पावसाच्या सरी कोसळत होत्या. दरम्यान जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यांपासून सुरू असलेल्या पावसामुळे तिवसा, अमरावती आणि चांदूर रेल्वे तालुक्यातील बहुतांश भागातील सोयाबिनला तर जबर फटका बसलेला आहे. या तिन्ही तालुक्यासह इतर काही भागात सोयाबिन पिवळे पडलेले आहेत. वेळेपुर्वीच सोयाबिन पिवळे झाले असून शेंगासुध्दा परिपक्व झालेल्या नाहीत. त्या कारणाने शेतकऱ्याचे खरीप हगांमातील मुख्य पिक असलेले सोयाबिन जवळजवळ हातातून गेले आहे. सलग तिसऱ्या वर्षी जिल्ह्यातील कोणत्या ना कोणत्या भागात सोयाबिनने शेतकऱ्यांसोबत दगा फटका केला आहे.



त्यामुळे येत्या वर्षी सोयाबिन पेरायचे कि नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा झाला आहे. मशागत खर्च अधिक असूनही कापसाला भाव मिळत नाही, सोयाबिनलासुध्दा भाव नाही, उत्पन्नही नाही. अशावेळी खरीपात काय पेरायचे अशा पेचात शेतकरी अडकले आहेत.

# गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यावर चाकूहल्ला करणारे आरोपी जेरबंद

## हमालपुरा येथील विसर्जन मिरवणुकीतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती :**

दोन गणेश मंडळांतील कार्यकर्ते आमनेसामने येऊन एका कार्यकर्त्यावर चाकूहल्ला झाल्याची घटना मंगळवार, ९ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास हमालपुरा येथे घडली. त्या प्रकरणात राजापेठ पोलिसांनी यवतमाळ जिल्ह्यातील दुर्गम भागात लपून बसलेल्या तीन आरोपींना अटक केली असल्याची माहिती शुक्रवारी देण्यात आली.

नितेश उर्फ सोनू आगाशे (३४), पप्पू कुब्डे (२६) व सूरज मेश्राम (३०) तिघेही रा. हमालपुरा अशी आरोपींची नावे आहेत, तर संकेत जगताप असे जखमी युवकाचेनाव आहे. हमालपुरा परिसरात मंगळवारी रात्री वीर तानाजी गणेशोत्सव मंडळाची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली होती. संकेत जगताप हा मिरवणुकीत नाचत असताना, त्याचा धक्का आरोपींना लागला. त्यामुळे त्यांच्यात वाद झाला. परिणामी, आरोपींनी अचानक चाकूने संकेत जगताप याच्यावर हल्ला करून त्याला जखमी केले होते. घटनेच्या दिवशी दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले होते. पोलिसांनी तातडीचे तपासचक्र फिरवून आरोपींचा शोध घेतला. त्यांलेळी ते यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी येथील दुर्गम भागात लपून बसले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार त्यांना अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

# पुणे-अमरावती-पुणे साप्ताहिक ट्रेनदिवाळीनिमित्त १६ सेवा फेऱ्या करणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

दिवाळीत प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेद्वारे पुणे – अमरावती – पुणे साप्ताहिक विशेष ट्रेनची सुविधा देण्यात आली आहे. अमराव येथील अनेक विद्यार्थी, युवक हे पुण्यात शिक्षण व नोकरीनिमित्त आहेत. त्यांना बेट अमरावती येथे येता यावे, या उद्देशाने विशेष ट्रेन दिवाळीच्या कालावधीत ७ऑक्टोबर ते २६ नोव्हेंबर या कालावधीत १६ फेऱ्या करणार आहे.गाडी क्र. ०९४०३ ही ७ ऑक्टोबरते २५ नोव्हेंबर या कालावधीत प्रत्येक मंगळवारी पुणे येथून सायंकाळी ७.५५ वाजता सुटेल आणि अमरावती येथे दुसऱ्या दिवशी सकाळी १०.०५ वाजता पोहोचेल. हे विशेष साप्ताहिक रेल्वे ८ फेऱ्या करणार आहे. त्याचप्रमाणे गाडी क्र. ०१४०४ ही ८ ऑक्टोबर ते २६ नोव्हे. पर्यंत प्रत्येक बुधवारी अमरावती येथून दुपारी १२.०० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी रात्री १२.१५ वाजता पोहोचेल.ही ट्रेनही ८ फेऱ्या करणार आहे. साप्ताहिक विशेष ट्रेन दौंड कॉर्ड लाईन, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड जं., चाळीसगाव जं., मलकापूर, शेगाव, अकोला जं., भुसावळ जं., मुर्तिजापूर आणि बडनेरा या स्थानकावर थांबे घेणार असून, चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी, देन सामान्य द्वितीय व्यवस्थेसह गार्ड ब्रेक व्हॅन, अशी या विशेष साप्ताहिक ट्रेनची संरचना आहे.

# आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची ट्रान्सस्पोर्ट नगर, ट्रान्सस्पोर्ट मार्केट परिसरात पाहणी

## अतिक्रमण हटविण्याचे आणि जागा विकसित करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी ट्रान्सस्पोर्ट नगर, ट्रान्सस्पोर्ट मार्केट, अबुबकार नगर, सोपीयान नगर परिसरातील नाली, अतिक्रमण, भंगार साहित्य तसेच प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत तारखेडा येथे सुरु असलेल्या बांधकामांची पाहणी केली.या पाहणीदरम्यान आयुक्तांनी संबंधित विभागांना तत्काळ अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सदर जागा विकसित करण्याबाबतही त्यांनी आदेश दिले. बाजार परवाना विभाग व अतिक्रमण विभागाला अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याचे सक्त निर्देश देण्यात आले.महानगरपालिकेच्या या कार्यवाहीमुळे संबंधित परिसरात स्वच्छता, शिस्तबद्ध विकास आणि नागरिकांसाठी आरोग्यदायी वातावरण उपलब्ध होणार आहे. या पाहणी दरम्यान आयुक्तांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सदर नागरिकांच्या समस्या निराकरण करण्याचे संबंधीत अधिका-यांना निर्देशित करण्यात आले.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश दिले की, ट्रान्सपोर्ट नगर, ट्रान्सपोर्ट मार्केट, अबुबकार नगर व सोपीयान नगर परिसरातील अतिक्रमण तातडीने हटवून जागा स्वच्छ व सुशोभित करावी. भंगार साहित्य पूर्णपणे काढून टाकावे तसेच सदर जागा विकसित करण्याची कार्यवाही तातडीने हाती घ्यावी. बाजार परवाना विभाग व अतिक्रमण विभागाने कठोर कारवाई करून नागरिकांना स्वच्छ व सुसंस्कृत परिसर उपलब्ध करून द्यावा.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आवाहन केले की, नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करू नये. स्वच्छता आणि शिस्तबद्ध विकासासाठी प्रशासनाला सहकार्य करावे. आपला परिसर सुंदर, हिरवागार आणि स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा.यावेळी तारखेडा येथील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सुरू असलेल्या बांधकामांचीही त्यांनी पाहणी केली. कामांना गती देऊन दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देत, या योजनेंतर्गत नागरिकांना त्वरित दिलासा मिळावा असेही त्यांनी सांगितले.या पाहणी दरम्यान शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, उदय चव्हाण, उपअभियंता विवेक देशमुख, अभियंता आनंद जोशी, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डिक्याव, राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.



# मिट द प्रेस मध्ये मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या दिलखुलास गप्पा

## हॉकर्स झोन,स्वच्छता वर लक्ष केंद्रित करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शुक्रवारी पत्रकारांसोबत अनौपचारिक चर्चा केली. यावेळी त्यांनी दिल्ली ते अमरावती या दरम्यानचा आयुष्यातील प्रवास सहज उलगडला. सोबतच शहरातील विकासकामांचा रोडमॅपही त्यांनी मांडला.

जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे पार पडलेल्या मिट ड प्रेस'मध्ये मनपा आयुक्तांनी मनमोकळेपणाने संवाद साधता यावधी त्यांनी सांगितले की, त्यांचे आई-वडील व आता भाऊसुद्धा व्यवसायाने डॉक्टर आहेत. सौम्या शर्मा यांनीही सुरूवातीला वैद्यकीय क्षेत्रात जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पुढे त्यांनी ते क्षेत्र सोडून विधी शाखेचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर २०१७ मध्ये त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली. सुरुवातीपासूनच वृत्रपत्र वाचन व अभ्यासाची आवड असल्याने त्याचा फायदा लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झाला आणि विशेष म्हणजे एकाच वर्षात ही परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केली, त्यानंतर त्यांची नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे नियुक्ती झाली. पुढे नागपुर स्मार्ट सिटी प्रकल्प व आता अमरावती महापालिकेत त्या आयुक्त म्हणून कार्यरत आहे. महापालिका क्षेत्राबद्दल बोलताना, त्या म्हणाल्या की इतर शहरांच्या तुलनेत येथे पाणी मुबलक व शुद्ध आहे. तसेच रस्ते चांगल्यापैकी विस्तीर्ण आहेत. कचरा विस्तारारणासाठी स्वतंत्र डेपो आहे. त्यामुळे येथील भौगोलिक रचना विकासाच्या दृष्टीनेही पोषक आहे. अमरावतीकरांच्या विरंगुळधासाठी छत्री तलाव व वडाळी तलाव विकसित करण्याचे नियोजन आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये पटसंख्या उपलब्ध करून देण्यावर भर आहे. शहरातील वाढली असून, आणखी तंत्रज्ञानयुक्त सुविधा सुरू आहे. विदर्भासह अमरावती जिल्ह्याचीही स्मशानभूमी विकसित करण्याबावतती नियोजन स्वतंत्र ओळख व संस्कृती असून, या सर्व जमेच्या बाजू असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

**.... अन् प्रशिक्षणादरम्यान सौम्या थर्मा पडल्या प्रेमात**

प्रशिक्षणादरम्यानच सौम्या शर्मा यांची ओळख आयपीएस असलेल्या अर्थित चांडक यांच्याशी झाली. त्यामुळे त्यांच्यात एकमेकांबद्दल विश्वास व आपुलकीचे संबंध तयार झाले आणि पुढे ते विवाहबंधनातही अडकले. सध्या अवघ्या नऊ महिन्यांचे बाळ असल्याने जबाबदारी अधिक वाढली असल्याचे सौम्या शर्मा यांनी सांगितले.

**स्वच्छता, हॉकर्स, सीसीटीव्हीचा प्रश्न सोडवणार**

शहरात स्वच्छतेशी संबंधित अनेक समस्या आहेत. त्या सोडवण्यास प्राधान्य दिले आहे. काही प्रमाणात यशही मिळाले. त्याचप्रमाणे सीसीटीव्हीचा प्रस्ताव राज्य स्तरावर मंजूर झाला आहे. महाआयटीचे त्यावर काम सुरू आहे. हॉकर्सची समस्या सोडवण्यासाठी ग्रीन वरेडझोन तयार करणार असून, यासाठी महत्वाच्या बेठकी झाल्या आहेतजे हॉकर्स झोनचा वापर करणार नाही, त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करावीच लागेल. पार्किंगची समस्या सोडवण्यासाठीपे ॲण्ड पार्क सुरू करणार. मनपाची आर्थिक चणचण दूर करण्यासाठी मोठ्या थकबाकीदारां कडून वसुली, जाहिरातीचे होर्डिंग लावणे, व्यापारी संकुलाचा प्रश्न सोडवणे, यासाठी पर्यटन वाढीसाठी वडाळी व छत्री तलावाचे सौंदर्याकरण करणे ही कामे प्राधान्याने केली जाईल, असेही मनपा आयुक्तांनी स्पष्ट केले.

# नांदगाव पेठमध्ये अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश पोलिसांची धडक, लाखोंचा मुद्देमाल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नांदगाव पेठ**

परिसरातील शासकीय वसाहत मध्ये नांदगाव पेठ पोलिसांनी धडक कारवाई करून अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.१२ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी नांदगाव पेठेतील शासकीय वसाहतीत अचानक धाड टाकली असता, तेथे एका घरात एलपीजी सिलेंडरची मोठ्या प्रमाणावर साठवणूक करून मशीनद्वारे अवैधरित्या रिफिलिंगचे काम सुरू असल्याचे आढळून आले. या धाडीत तब्बल ५८ एलपीजी सिलेंडर, ३ रिफिलिंग मशीन, २ मोठे वजन काटे असा सुमारे चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आला. या प्रकरणी साबीर लष्कर हासिम लष्कर (वय ४०, रा. शासकीय वसाहत, नांदगाव पेठ, अमरावती) यास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध पुढील कारवाई सुरू आहे.नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणारा हा अवैध व्यवसाय उघड झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.विविध कंपन्यांचे जवळजवळ ५८ सिलेंडर याठिकाणी आढळून आले. सिलेंडर मधून गॅस रिफिलिंग करून ऑटोचालक व ग्राहकांना विकण्याचा गोरखधंदा याठिकाणी गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होता.सिलेंडरच्या अवैध साठवणुकीमुळे आणि मशीनद्वारे केलेल्या बेकायदेशीर रिफिलिंगमुळे कोणत्याही क्षणी भीषण स्फोट होऊन मोठे अनर्थ घडण्याची शक्यता होती.याबाबत पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांना गुप्त माहिती मिळताच त्यांनी या गंभीर प्रकरणी तत्काळ कारवाई करत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून संपूर्ण साहित्य जप्त केले. ही धडक कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या नेतृत्वाखाली, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे व सपोआ कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पो. उपनि. नवलकर, पोहेका राऊत, पो.शि. निलेश साविकार, राजा सय्यद, राजिक खान आणि वैभव तिखीले यांनी महत्वाची भूमिका बजावली.या संपूर्ण कारवाईनंतर नांदगाव पेठ परिसरात अवैध गॅस रॅकेटचा पर्दाफाश झाल्याने नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले असून, अशा अवैध धंद्याविरोधात कठोर कारवाई सुरू राहावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# देशातील प्रथम व्यापारी संमेलन वरूडात

## खा. डॉ. अनिल बोंडे यांची माहिती, भारतीय महासंघाचा पुढाकार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३वरुड**

शहरात लवकरच कॅटच्या माध्यमातून स्वदेशी मेळावा व व्यापारी संमेलन घेणार असून भारतातील प्रथम व्यापारी संमेलनाचा मान मला मिळाला आहे, असे खा. डॉ. बोडे यांनी शाखा उद्घाटनाच्या वेळी सांगितले कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स नवी दिल्ली (सीएआयटी) महणजे भारतीय व्यापारी महासंघाच्या शाखेचे महाराष्ट्रात प्रथमठ राष्ट्रीय अध्यक्ष भरतीया यांच्याहस्ते व खा. अनिल बोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उदघाटन झाले.

यावेळी कार्यक्रमाच्या अधयक्षस्थानी विदर्भ प्रांत कॅटचे अध्यक्ष विनोद कलत्री होते. मंचावर महात्मा फुले बैंकेचे अध्यक्ष दिलीप लोखंडे, प.स. माजी सभापती विक्रम ठाकरे, एकवीरा महिला कॅटच्या जिल्हाध्यक्षा डॉ. कुंदन वेदराष्ट्रीय को ऑर्डीनर श्याम शर्मा, कैंटचे जिल्हाध्यक्ष गोविंद सोमाणी, भारतीय व्यापारी महासंघाचे वरूड तालुकाध्यक्ष गिरीधर देशमुख, कार्याध्यक्ष रितेश शाह, सचिव जगदीश उपाध्याय, महिला कैंटच्या अध्यक्षा पूनम जैन, मयुर गांधी, जिल्हा महामंत्री आत्माराम पुरसवाणी, जिल्हा उपाध्यक्ष अनुप हरवाणी तसेच सचिव विधी नावदर उपस्थित होते यावेळी खा. बोडे व भरतीया याचा गिरीधर देशमुख, रितेशशाह व जगदीश उपाध्याय याच्याहस्ते सत्कार करण्यात आला. व्यापारी महासंघाला मार्गदर्शन करताना खा. बोडे यांनी प्रधानमंत्री मोदी यांचे आभार मानाले व पुढील विडीकरिता जीएसटी स्लॅब लागू केला, त्याचा थेट फायदा देशातील जनतेला, ज्यापाऱ्यांना, मध्यमवर्गीय लोकांना होणार असल्याचे मत व्यक्त केले. ते म्हणाले, प्रधानमंत्री मोदी यानी आपआपल्या मतदारसंघात व्यापारी संमेलन घेऊन स्वदेशी मेळावा घेण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठीच गिरीधर देशमुख यांनी मला दिल्लीवरून तातडीने बोलावून घेतले. यामुळे भारतात प्रथम व्यापारी संमेलन घेण्याचा मान मला मिळाल्याचे खा. बोडे बोलताना म्हणाले. तालुकास्तरीय कॅटचे उद्घाटक समुदायाला मार्गदर्शन करताना भरतीया यांनी व्यापारी जीएसटीचा लाभ२२ सप्टेंबरपासून होणार असून व्यापाऱ्यांनी आत्मनिर्भर व्हावे त स्वदेशीचा वापर करावा, तसेच महिलांनी आर्थिक सक्षम व्हावे, असे आवाहन केले.स्वाती गडेकर यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यावलकर यांनी करून दिला. पाहुण्यांचा परिचय आचल आभार प्रदर्शन रितेश शाह यांनी केले.

# स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अंतर्गत अमरावती महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम

## गाडगे नगर जीवीपी पॉईंटचे 'टाकाऊ पासून टिकाऊ' संकल्पनेवर आधारित सौंदर्यीकरण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी अमरावती महानगरपालिकेने गाडगे नगर येथील जीवीपी पॉईंटचे सौंदर्यीकरण 'टाकाऊ पासून टिकाऊ' या संकल्पनेवर आधारित करत एक अभिनव उपक्रम राबविला आहे.

या उपक्रमात जुन्या टाकाऊ टायरला रंगवून त्यामध्ये वृक्षारोपण करण्यात आले असून, वापरलेल्या प्लास्टिक बाटल्यांना आकर्षक रंग देऊन परिसराची सजावट करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे परिसर अधिक देखणा, पर्यावरणपूरक आणि लोकांचे लक्ष वेधून घेणारा बनला आहे. त्याचबरोबर नागरिकांमध्ये पुनर्वापर व पुनर्चक्रणाविषयी जागरूकता निर्माण झाली आहे.

टाकाऊ साहित्याच्या सर्जनशील वापरातून साकारलेली ही सजवलेली जागा स्थानिक रहिवाशांसाठी प्रेरणादायी ठरत असून, पर्यावरण संवर्धनासोबतच शहराच्या सुशोभीकरणातही मोलाची भर घालत आहे.

अमरावती महानगरपालिका भविष्यातही अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छता, शहरसौंदर्य आणि पर्यावरण रक्षणासाठी आपले प्रयत्न सातत्याने सुरू ठेवणार आहे.

# केळीने भरलेला आयशर ट्रक उलटला तीन जखमीबसस्थानक चौकातील घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अंजनगावसुर्जी**

बसस्थानक चौकात गुरुवार ११ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास केळीने भरलेला आयशर ट्रक अचानक पलटी झाल्याने परिसरात मोठी धावपळ उडाली. या अपघातात एक जण गंभीर, तर दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींना स्थानिक नागरिकाच्या मदतीने तत्काळ ग्रामीण रुग्णालय दाखल करण्यात आले.

आयशर ट्रूक हा भरधाव वेगात हिवरखेड येथून केळीचे कॅरेट भरून अकोटअंजनगावमार्गे मध्यप्रदेशकडे जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रक थेट डिहायडरवरचढल्याने चौकात पलटी झाला ट्रकमध्ये भरलेली केळीचे कॅरेट रस्त्यावर विखुरल्याने काही वेळ वाहतूक कोंडी निर्माणझाली होती. स्थानिक नागरिकांनीतत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेतली व रुग्णांना रुग्णालयात हलवले. अपघातात गंभीर जखमी झालेला संजयनगर देवरी मध्यप्रदेश येथील व्यक्ती गंभीर असल्याने त्याला उपजिल्हा रुग्णालयात उपचारकरिता हलविण्यात आले. तर आयशर चालक राजुल पाराशर (२५) व मोनू अहेरवार (२५) दोन्ही रा. देवरी जि. शिवणी मध्यप्रदेश यांना किरकोळ जखमी झाल्याने प्राथमिक पोलिसस्टेशन अंजनगाव येथे नेण्यात आले.

# अप्परवर्धा धरणाची सर्व तेराही दारे पुन्हा उघडली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मोर्शी**



१२ सप्टेंबर रोजी अप्परवर्धा धरणाचे रात्री ९ वाजता पुन्हा १३ पैकी १३ दरवाजे ४० सेंटिमीटरने उघडण्यात आले असून त्यामधून आता ८४४ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे.अप्परवर्धा धरणातील पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असून मध्यप्रदेशातील जाम नदी व सालबर्डी येथून वाहणारी माडूनदी तुडुंब भरून वाहत आहे. त्यामुळे धरणाच्या जलसाठ्यात झपाट्याने वाढ असल्याने तसेच वर्धा नदीखालील भागातील नदी-नाले इत्यादींचा विसर्ग नदीच्या पात्रामध्ये राहणार असल्यामुळेनदीचे पाण्याच्या पातळीमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता बघता व अपेक्षित पर्जन्यमानाचा विचार करता तसेच धरणामध्ये येणाऱ्या येव्यानुसार जलाशय प्रचलन सूचीनुसार पुन्हा विसर्ग वर्धा नदीपात्रात सोडण्यात वेळ आली आहे. २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता पाण्याच्या साठ्याची टक्केवारी ९६.२७एवढी होती. अप्परवर्धा धरणाची निर्धारित पाण्याची पातळी ३४२.५० मिलिमीटर एवढी ठेवण्यात आली असून सध्या ही पातळी ३४२.३७ मिलिमीटर झाली आहे. त्यामुळे जवळपास ९७.८७ टक्के धरण भरलेले आहे.

# चिखलदरा कृषी कार्यालयात कागदपत्रांची उधळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अचलपूर**

अचलपूर चिखलदरा तालुका कृषी कार्यालयाच्या एका बंद खोलीतील महत्त्वाच्या कागदपत्रांना उधळी लागली आहे. त्यामुळे उधळी लागलेल्या कागदपत्रांना अद्ययावत करण्याचे फार मोठे आज्ञान कर्मचाऱ्यांपुढे उभे ठाकले आहे.

सद्यस्थितीत सदर कार्यालय अचलपूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टी एम सी वार्डमध्ये स्थानापन्न आहे. मात्र या कार्यालयाअंतर्गत काटकुंभकृषी मंडळ उपविभागीय कृषी कार्यालयाच्या परिसरामधील एका



इमारतीमध्ये आहे. जवळच एका पडिक इमारतीमध्ये लाकडी व लोखंडी कपाटामध्ये महत्त्वाची कागदपत्रे असलेल्या शेकडो फाईल्स ठेवण्यात आल्या आहे. सदर इमारतीच्या टीनाच्या छतामधून पावसाचे पाणी टपकते, त्यामुळे या इमारतीत ओलावा तयार झाला आहे. लाकडी कपाटामध्ये असलेल्या कागदपत्रांना चांगलीच उधळी लागलेली असून उथळीने अनेक कागदपत्रे खराब झाली आहे. तालुका कृषी विभागाने अनेक दिवस सदर इमारतीकडे आणि कपाटातील कागदपत्रांकडे ढुंकून पाहिले नसल्यानेच सदरची उधळी लागल्याचे दिसून येत आहे. गुरुवारी दिवसभर सदर इमारत उघडून त्यातील कपाटातील कागदपत्रांची छाननी करताना काही कर्मचारी दिसून आले.तेव्हा सदरचे वास्तव पुढे आले. जे कागदपत्रे सुरक्षित आहे, अशा कागदपत्रांची अबकड अशा श्रेणीमध्ये विभागणी केली जाणार आहे. त्यापैकी उधळीच्या तावडीतून वाचलेल्या अबक श्रेणीतील कागदपत्रांना व्यवस्थित सांभाळून ठेवण्याची कसरत आता कृषी कर्मचाऱ्यांना करावी लागणार आहे. अशा महत्त्वाच्या कागदपत्रांमध्ये देयके, कर्मचा-यांची पगार देयके कॅशबुक, सेवापुस्तिका, आदींचा समावेश आहे. उर्वरित मापनपुस्तिका, लेखा रजिस्टर, कागदपत्रांचे निर्लेखन करण्यात आले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आईच्या अपमानाचा भाजपकडून तीव्र निषेध - अमरावतीत काँग्रेसविरोधात संतप्त आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आईचा काँग्रेसकडून कथित अपमान झाल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपने आज अमरावतीत संतप्त आंदोलन छेडले. शहरातील राजकमल चौकात भाजपचे शेकडो कार्यकर्ते जमले होते. राहुल गांधी मुर्दाबाद, काँग्रेस हाय हाय अशा घोषणांनी परिसर अक्षरशः दणाणून गेला.

या आक्रमक आंदोलनात भाजप महिला मोर्चाचा देखील मोठा सहभाग होता. महिला पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधताना सांगितले की, पंतप्रधानांच्या आईबद्दल अपमानास्पद वक्तव्य करून काँग्रेसने संपूर्ण देशाचा अपमान केला आहे.भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सुरेखा लुंगारे यांनी माध्यमांशी बोलताना काँग्रेसला थेट इशारा दिला की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आईचा अपमान भाजप कधीच सहन करणार नाही. काँग्रेसने जर याबाबत माफी मागितली नाही, तर आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल.

यावेळी भाजपचे जिल्हा व शहर पदाधिकारी, महिला मोर्चा कार्यकर्ते, तसेच सर्वसामान्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. काँग्रेसच्या नीच राजकारणाविरोधात लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.भाजपच्या संतप्त आंदोलनामुळे संपूर्ण परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. काँग्रेसने यावर भूमिका मांडावी, अशी जोरदार मागणी देखील भाजपकडून करण्यात आली.

# मेळघाटातील नरभक्षक वाघाचे स्थलांतर निश्चित वनमंत्रालयात उच्चस्तरीय बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



मेळघाट वनक्षेत्रात नागरिकांवर सातत्याने हल्ले करणाऱ्या त्या नरभक्षक वाघाच्या स्थलांतराचा निर्णय अखेर घेण्यात आला आहे. शुक्रवार, दिनांक १२ सप्टेंबर रोजी वनमंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आमदार रवी राणा, आमदार केवलराम काळे, यशवंत काळे, शैलेश म्हाला यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना तत्काळ अनुकंपा तत्वावर शासन सेवेत घेण्याचे निर्देश मंत्री गणेश नाईक यांनी दिले. यासोबतच मेळघाट वन विभागात थांबलेल्या रस्त्यांच्या विकास कामांना नव्याने गती देण्याचा निर्णयही घेण्यात आला.नरभक्षक वाघाने आतापर्यंत सहा निष्पाप नागरिकांचा बळी घेतल्याचे स्पष्ट झाले असून, त्याचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्यात येणार आहेत.तसेचमेळघाटातील दुर्गम भागातील नागरिकांसाठी आवश्यक असलेले रस्ते जसे की बारूखेडा ते झरी, चौराकुंड ते फुकमार, खोकमार ते दतरू, राजापूर ते रेटाखेडा, माखला ते जरीदा, रेस्ट हाऊस ते हरिसाल, कोंगळा ते कळमगुना, केशरपूर ते मालूर, फॉरेस्ट ते जाबळी आर रेंज या रस्त्यांच्या डांबरीकरण व दुरुस्तीच्या कामांना गती देण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

वन विश्रामगृहांचे होणार आधुनिकीकरणबेलकुंड, ढाकणा, हतरू, तारूबांदा, माखला, कोकरू, कोलकास, सेमाडोह, घटांग या ठिकाणी असलेल्या वन विभागाच्या विश्रामगृहांचे आधुनिकीकरण, रंगरंगोटी व सौंदर्यीकरण करण्याचे आदेश देण्यात आले.

रामवाटिका प्रकल्पास मंजुरीअमरावती तालुक्यातील मंजूर रामवाटिका प्रकल्पासाठी २५ कोटी रुपयांच्या निधीतून बांधकाम करण्याचा निर्णय देखील या बैठकीत घेण्यात आला.या निर्णयांमुळे मेळघाटातील नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला असून, वन्य प्राण्यांच्या धोक्यापासून संरक्षण व आदिवासी भागाचा सर्वांगीण विकास यासाठी शासन सकारात्मक पावले उचलत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# अंजनगाव सुर्जी बाजार समितीत नव्या सोयाबीनचा शुभारंभ – मुहूर्ताला मिळाला४७५१ दर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अंजनगाव सुर्जी**



तालुक्यातील यंदाच्या हंगामातील नव्या सोयाबीनची पहिली आवक शुक्रवार, १२ सप्टेंबर रोजी अंजनगाव सुर्जी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत झाली. शेतकरी विनोद पाटील गोळे (रा. हंतोडा) यांनी आपल्या शेतातील नवीन सोयाबीन बाजारात आणत हंगामाची मुहूर्ताची सुरुवात केली.

खरेदीदरम्यान मोहम्मद सादिक ट्रेडर्सतर्फे मो. सिद्दिक यांच्या अडतीत नागेश भाबुरकर व राजू आवारे या व्यापाऱ्यांनी सोयाबीन ४७५१ प्रति क्विंटल या दराने खरेदी केली. दराच्या बाबतीत समाधान व्यक्त करत शेतकरी गोळे यांचा बाजार समितीचे संचालक चंद्रशेखर शेळके यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.या शुभारंभप्रसंगी बाजार समितीचे संचालक सुरेश आळे, प्रदीप इंगळे, सागर घोगरे, शेख जमील, शेख रहमान, प्र. सचिव अमर साबळे, प्रदीप आठवले यांच्यासह व्यापारी व अडते – ज्ञानेश्वर पोटदुखे, ज्ञानेश्वर ठाकरे, संजय चोरे, हनुमंत चोरे, सरफराज भाई, विजय भाबुरकर, अनिल देवळे, राजेश धुळे, सुहास मानकर, महेंद्र सावरकर, जब्बार भाई, राजकुमार देवळे – यांची उपस्थिती होती.तसेच हमाल, मापारी, मदतनीस आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधवांनी उपस्थित राहून या मुहूर्ताच्या लिलावास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हंगामाची सुरुवात उत्साहात झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले.

# विश्वशांतीसाठी संतांची शिकवण आवश्यक अमृतमंथन व्याख्यानमालेत डॉ. संजय उपाध्ये यांचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**








संत ज्ञानेश्वर माऊली यांनी वयाच्या २१ व्या वर्षी इसवी सन १२९६ मध्ये इंद्रायणी काठी देवाची आळंदी येथे संजीवन समाधी घेतली. संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या समाधीला ७५० वर्षे आज पूर्ण होत आहेत. या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष जयंती दिन वर्ष साजरे केले जात आहे. संत ज्ञानेश्वर यांनी ९००० ओव्या असलेलाज्ञानेश्वरी ग्रंथ यावर सार ग्रहण करून अवघ्या नऊ ओव्यांचे पसायदान प्रसाद रुपी दान आपले विश्वगुरू थोरले बंधू संत श्री निवृत्तीनाथ महाराज यांना पसायदान मागितले आहे.

या पसायदानात विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना ते आपल्या सद्गुरु कडे करतात.पसायदान ही निर्मिती संत ज्ञानेश्वर माऊलींचे ही विश्व कल्याणाची प्रार्थना म्हणजे संत ज्ञानेश्वराच्या वैश्विक सद्भावनेचा व प्रतिभेचा परमोच्च साक्षात्कार होय. जगाला विश्वशांतीचा संदेश देणारे पसायदान संत ज्ञानेश्वरांनी सांगितले, असे प्रतिपादन लेखक व वक्ते डॉ संजय उपाध्ये यांनी केले. तुषार भारतीय मित्र परिवार तर्फे आयोजित तीन दिवशीय अमृतमंथन व्याख्यानमाला मध्ये 'आता विश्वात्मके देवे' विषयावर लेखक व वक्ते डॉ संजय उपाध्ये यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा प्रशांत इंगोले , तर प्रमुख पाहुणे तुषार भारतीय, चेतन गावंडे, रेखा भुतडा, लता देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ संजय उपाध्ये म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. भागवत धर्माचा आचरण अंगीकार करून कोणीही ईश्वर प्राप्त करून घेऊ शकतो. हे बिज माऊलींनी जनसामान्यांत रोवले. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस असे म्हटले जाते. ज्ञानेश्वरी ग्रंथाचे मुख्य प्रेरणा स्त्रोत हे त्यांचे बंधू विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ यांना मानले जाते.श्री भगवत गीतेचे ७०० श्लोक व १८ अध्याय आहेत या ७०० श्लोकांवर संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांनी ९००० ओव्या लिहिल्या व प्रत्येक ओवी विश्लेषित केले. ज्ञानेश्वर माऊली यांनी ज्ञानेश्वरीत कर्मयोग, भक्तियोग व ज्ञान योगाचे महत्त्व विशद केले आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञान आणि भक्तीचे प्रतिक बनले आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथामुळे भारतीय संस्कृती आणि संत वायायाकडे अखिल विश्वाचे लक्ष वेधले गेले. प्रास्तविकात मुख्य आयोजक तुषार भारतीय केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सुत्रसंचालन मंदार नानोटी यांनी, तर आभार ज्ञानेश्वर टाले यांनी मानले. शेवटी हभप ज्ञानेश्वर गुल्हाने महाराज यांनी पसायदानाचे गायन केले. या कार्यक्रमाला श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगड प्रकल्पाचे पाणी पळसखेड परिसरात शिरले शेकडो हेक्टर पीक पाण्याखाली, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३पळसखेड**



अमरावती जिल्ह्यातील पळसखेड परिसरात रायगड प्रकल्पाचे पाणी शेतात शिरल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. प्रकल्पाच्या आउटलेटचे काम अपूर्ण असून, त्याचे खोलीकरण न केल्यामुळे हे पाणी थेट शेतांमध्ये घुसले.

या अनागोंदीमुळे पळसखेड, भिलटेक, सोनोरा सावंगी या गावांतील शेतकऱ्यांच्या शेकडो हेक्टरवरील सोयाबीन, कपाशी व तुरीची पिके पाण्याखाली गेली आहेत. जलसंपदा विभागाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे.

शेतकऱ्यांनी शासनाकडे तात्काळ पंचनामे करून भरपाईची मागणी केली आहे. या घटनेमुळे संतप्त शेतकरी प्रशासनाकडे वळत असून, दोषींवर कारवाई करण्याची मागणीही जोर धरत आहे.जलसंपदा विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे भविष्य अंधारात गेले असून, शासनाने यावर तात्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी केली जात आहे.

# तिवसा येथील वरखेड येथे ऑपरेशन मंगळसूत्रच्या पोस्टर मधून जनजागृती : सुनील घोरमाडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३तिवसा**




अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील श्री समर्थ आडकुजी महाराज यांच्या पावनभूमी मध्ये चौका-चौकात ऑपरेशन मंगळसूत्र या पोस्टर चे लोकार्पण करून एक प्रकारची जनजागृती करण्यात आले.या पोस्टर च्या माध्यमातून सरकार पर्यंत संदेश पोहचविणे तसेच शेतकऱ्याच्या समश्या मांडण्यासाठी ग्रामनाथ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भैयासाहेब बोके यांनी शेतकऱ्याचे प्रश्न मांडण्यासाठी एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला आहे.वरखेड गावातील प्रत्येक चौकात ऑपरेशन मंगळसूत्र नावाचे पोस्टर लावून त्यावर शेतकऱ्याच्या समस्याचा उल्लेख केला आहे.या फलकांची तिवसा तालुक्यात चांगलीच चर्चा सुरु आहे. स्वामिनाथन आयोग तातडीने लागू करावा,शेतीपयोगी साधने व औषधे जिएसटी मुक्त करावीत.शेतकरी पुत्रांना नोकरीत आरक्षणासाह विशेष सवलती द्याव्यात.मनरेगा अंतर्गत शेतातील कामाना प्राधान्य द्यावे. या मागण्या सरकार पर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी ग्रामचौकात प्लेक्स लावून हा आंदोलना चा नवा मार्ग दाखवला आहे.या उपक्रमातून बोके यांनी प्रत्येक गावोगावी शेतकऱ्यांना जागरूक करून स्वखर्चाने प्लेक्स लावण्याचे आवाहन केले आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी क्रीडा साहित्याचे वाटप - लिपिकवर्गीय संघटना व युनियनचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३तिवसा**



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय संघटना (मान्यता प्राप्त) व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन, जिल्हा शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जि.प. उच्च माध्यमिक शाळा, विरगव्हाण (पं.स. तिवसा) येथील विद्यार्थ्यांना दर्जेदार क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना हॉलीबॉल नेट (२), हॉलीबॉल (४), टेनिक्वाइट नेट (१), टेनिक्वाइट रिंग (४), ३ किलोचा गोळा (१), भाला (१), थाळी फेक साहित्य (१), कॅरम बोर्ड (२) आणि उड्यांची दोरी (१ डझन) असे विविध सांघिक आणि वैयक्तिक क्रीडासाहित्य देण्यात आले. हे साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गटशिक्षणाधिकारी नितीन उंडे यांनी भूषवले. तर प्रमुख अतिथी म्हणून पंकज गुल्हाने (राज्य कार्याध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष, लिपिकवर्गीय संघटना), संजय राठी (जिल्हा सचिव), हेमंतकुमार यावले (राज्य प्रसिद्धी प्रमुख), श्रीकांत मेश्राम (जिल्हा कोषाध्यक्ष), निलेश तालन (जिल्हा संघटक), विजय कोठाळे (सहसचिव व संचालक, शिक्षक बँक), श्रीमती सरीता काठोळे (केंद्रप्रमुख व संचालक, शिक्षक बँक), तसेच चंद्रशेखर रामटेके (वि.अ.शि.) उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मुख्याध्यापक चरणसिंग चव्हाण, शिक्षिका पल्लवी निंघोट, नयन काळपांडे सर, भुरा धांडे सर, मुख्यमंत्री युवा कौशल्य शिक्षिका जयश्री जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन शिक्षिका दीपा लोंढे यांनी केले.संघटनेच्या सामाजिक व शैक्षणिक बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कार, शारीरिक तंदुरुस्ती आणि संघभावना वाढीस लागेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

# शेंदूरजना बाजार येथे श्रीसंत अच्युत महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ तिवसा**



वंदनीय श्रीसंत अच्युत महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन श्रीसंत अच्युत महाराज संस्थान, श्रीक्षेत्र शेंदूरजना बाजार येथे आज १३ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात आला यावेळी हजारो राज्यभरातून आलेल्या भाविकांनी श्री संत अच्युत महाराजांना वाहिली भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली '

आज १३ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता 'श्रीं'च्या पादुकांची रथ व भजनी दिंड्या समवेत शोभायात्रा काढण्यात आली सकाळी ८ वाजता वंदनीय श्रीसंत अच्युत महाराज यांच्या महानिर्वाणपर जीवनदर्शन पंडित रघुनाथ कर्डीकर व संच यांनी सादर केला . सोबतच सकाळी १० वाजता श्रीसंत अच्युत महाराज यांना भावपूर्ण मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली याप्रसंगी श्री जगद्गुरु रामराजेश्वर माऊली सरकार, आचार्य जितेंद्रनाथ महाराज, श्रीसंत शंकर महाराज,श्रीसंत सयाजी महाराज, श्रीसंत दुर्गा माता, श्रीसंत सचिन देव महाराज यांची उपस्थिती होती त्याचप्रमाणे राजकीय नेत्यांनी सुद्धा या ठिकाणी आपली उपस्थिती दर्शवली यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्रीसंत अच्युत महाराज संस्थानच्या भक्त निवासाच्या वास्तूचा भूमिपूजन समारंभ पार पडला त्यानंतर काल्याचे कीर्तन हभप कनेरकर महाराज यांच्या हस्ते झाले . त्यानंतर महाप्रसादाचे वितरण भाविक भक्तांना करण्यात आले. पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक,सामाजिक कार्यक्रमांच आयोजन या ठिकाणी करण्यात आले होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत